Impact Factor-8.632 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

## Single Blind Peer-Reviewed & Refereed Indexed

## Multidisciplinary International Research Journal

**December -2023**

**ISSUE No - (CDXLVII.) 447**








**Chief Editor**
**Prof. Virag S. Gawande**
**Director**
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor:**
**Dr.Dinesh W.Nichit**
**Principal**
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

**Executive Editor:**
**Dr.Sanjay J. Kothari**
Head, Deptt. of Economics,
G.S.Tompe Arts Comm,Sci Collage
Chandur Bazar Dist. Amravati

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

| | | |
|---|---|---|
| 20 | बौध्द तत्वज्ञान आणि आजची स्त्री प्रा. डॉ. हरिश्चंद्र गोविंदा बोरकर | 70 |
| 21 | भारताच्या आर्थिक विकासात डॉ. आंबेडकरांची समाजवादी भूमिका<br>श्री.विलास बापुरावजी कांबळे | 73 |
| 22 | राष्ट्रीय शिक्षा नीति २०२० और महिला सशक्तिकरण माया कनासे | 75 |
| 23 | हैद्राबाद मुक्ती संग्रामाचे प्रणेते–स्वामी रामानंद तीर्थ<br>प्रा.डॉ.उत्तम सिताराम कन्हाळे | 78 |
| 24 | आत्मनिर्भर भारत डॉ.शाहेदा मुनाफ | 81 |
| 25 | संसदीय लोकशाही समोरील अडचणी डॉ. नारायण पोहकर | 86 |
| 26 | महात्मा गांधी आणि विधायक कार्यक्रम प्रा. डॉ. नितीन दादाराव गौरखेडे | 89 |
| 27 | नाथजोगी समाज एक समाजशास्त्रीय अध्ययन डॉ. राहुल एस. खंडारे | 93 |
| 28 | भारतातील बालगुन्हेगारी - एक सामाजिक समस्या प्रा. बाळकृष्ण कारू रामटेके | 95 |
| 29 | ग्रंथालय व्यावसायिकांचे ताण व्यवस्थापन श्री.कमलाकर मधुकर सावंत | 98 |
| 30 | स्त्री आणि कुटुंब व्यवस्थापनात बालसंगोपन प्रा.सौ.सुषमा सु.जाजु | 102 |
| 31 | विद्यार्थी गुणवत्ता विकासामध्ये प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमाचे योगदान एक अभ्यास डॉ.भरत विनायक वानखेडे , रुपाली भगवान पवार | 106 |
| 32 | महाराष्ट्रातील सफाईकर्मचार्यांच्या सामाजिक परिस्थितीचा अभ्यास<br>दिक्षा अजयकुमार आनंद, डॉ. ज्ञानदेव एकनाथ झिने | 109 |

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (CDXLVII) 447
ISSN : 2278-9308
December, 2023

# नाथजोगी समाज एक समाजशास्त्रीय अध्ययन

डॉ. राहुल एस. खंडारे
समाजशास्त्र विभाग श्री. बा. दे. पारवेकर महाविद्यालय पांढरकवडा जि. यवतमाळ

प्रस्तावणा:— भारत हा विविध धर्म, पंथ, भाषा, सण, उत्सव, प्रथा, परंपरा असलेला देश आहे. हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन, जैन, बौध्द, पारशी, लिंगायत, ज्यू इत्यादी धर्म भारतात वास्तव्यास आहेत. तसेच आदिवासी भटक्या व विमूक्त जमाती आणि जातींचे सुध्दा वास्तव्य आहे. यामध्ये हिंदू बहूसंख्यांक आहेत तर इतर अल्पसंख्यांक जाती व उपजाती आढळून आहेत. ग्रामीण भागात व्यवसायावरून निर्माण झालेली बलूतेदारी पध्दत अनेक वर्षापासून आहे. बारा बलूतेदार व अठरा अलूतेदार जाती यांमध्ये भारतीय ग्रामीण समाज विभागला आहे.

महाराष्ट्रात बलूतेदारी पध्दतीसोबत रूढी परंपरा कुळाचार व्यवसाय असलेल्या अनेक जाती व पोटजाती निर्माण झाल्या. आपले सामाजिक अस्तित्व टिकवण्यासाठी जातींनी खानपानविषयक रोटीबेटीविषयक आणि श्रेष्ठकनिष्ठत्वाचे नियम तयार केले. जातीव्यवस्थेतील या नियमांमूळे काही जातींना समाजव्यवस्थेत कनिष्ठ मानले जाउ लागले. तर काही जातींना अस्पृश्य म्हणून खालच्या स्तरामध्ये जीवन जगावे लागले.

समाजव्यवस्थेत कोणतही स्थान नसलेल्या अस्पृश्य जातीप्रमाणेच सतत भटकंती व स्थलांतर करून आपला उदरनिवार्ह करणाया भटक्या जाती व जमातींचेही वास्तव्य महाराष्ट्रात आहे. पिढयानपिढया भटकंती करीत असल्याने स्थिर जीवनाच्या लाभापासून हा समाज वंचीत राहीलेला आहे. स्वताची शेती नाही, जमीन नाही, जागा नाही अशी अवस्था या समाजाची आहे. आपली जमात व कुटूंब हेच त्यांच्या जीवन मरणाचे एक विश्व झालेले आहे. या विश्वात त्यांनी आपली वेगळी संस्कृती आणी रूढी, परंपरा निर्माण केली आहे. अनेक वर्ष शिक्षणपासून वंचीत राहील्याने हा समाज अत्यंत दरिद्रिय, पराकोटीचे अज्ञान, अंधश्रध्दा आणि सामाजीक दृष्टया मागासलेला आहे.

महाराष्ट्रात भटक्या आणि विमूक्त जमाती आणि जातींची संख्या बेचाळीस असल्याचे मानले जाते. महाराष्ट्र सरकारने जाहीर केलेल्या भटक्या व विमुक्त जाती आणि जमातीची यादी पुढीलप्रमाणे आहे.

भटक्या जाती :—

१)बाबा बैरागी २) बेलदार ३)भराडी बाल संतो ी, नाथबाबा, नाथजोगी,डवरी गोसावी ४) भूते भोपे ५)चलवादी ६)चित्रकथी ७)गारूडी, सापगारूडी ८)घिसाडी ९)गोंधळी १०)गोल्ला ११)गोपाळ भोटपी १२)हेळवे १३) जोशी बुडबुडकी, डमरूवाले, कुडमूळे, मेंडकी सरोदे १४) काशी कापडी १५)कोल्हाटी डोंगरी १६)मैराळ दांगटवार १७)मसणजोगी सिंग गुडसींद १८) नंदीवाले ढवळानंदीवाले तिरमळनंदीवाले १९) पांगूळ २०) रावळ २१)सिक्कलगार कटारी २२)ठाकर २३)वैदू झिंगाभेई २४) वासूदेव २५) भोई २६) ओबारी २७) ढेलारी २८) छप्परबंद

विमूक्त जाती :—

१) बेरड २)भामटा ३) बेस्तर ४) कंजारभाट ५) पारधी ६) कटवू ७)वडार ८)कैकाडी ९)बंजारा लमाण १०) राजपूत भामटा ११)रामोशी १२)मांगगारूडी १३) वाघरी

भारतीय समाजात बही कृत, खालच्या पातळीवरील स्थान आणि ब्रिटीश काळापासून गुन्हेगारी जमात म्हणून लागलेले लेबल यामूळे शिक्षणाच्या सोयी, स्थिर व्यवसाय, समाजातील स्थान यापासून भटक्या जाती व जमाती वंचीत राहील्या. १८७१ मध्ये एखादी जमात गुन्हेगार जाहीर करण्याचा कायदा ब्रिटीश सरकारने सुरू केला. परंतू नंतर भारत सरकारने १९५२ मध्यो कायदा करून १३ जाती आणि जमातींना त्यामधून विमुक्त करण्यात आले.

महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या भटक्या जमातींची संख्या २८ एवढी आहे. त्यापैकी नाथजोगी ही भटकी जामत आहे.सतत भटकंती करून उदरनिर्वाह चालवणे, भिक्षा मागणे, लोकांचे भविष्य सांगणे, गाणी म्हणणे, इत्यादी व्यवसायामूळे नाथजोगी अतिशय हालाखीचे जीवन जगत आहेत. काही नाथजोगी स्थायी झालेले आहेत. तर काही अजूनही भटके जीवन जगत आहेत. शिक्षणाचा अभाव, दारीद्रय, भूमीहीनता, यामूळे नाथजोगी समाजाची दुरावस्था झालेली आहे.

महाराष्ट्रात अनेक भटक्या आणि विमूक्त जमाती आणि जातींवर समाजशास्त्रज्ञांचे . अध्ययन सुरू आहे. तर काही संशोधकांचे संशोधनकार्य पूर्ण झालेले आहे. परंतू नाथजोगी समाजावर अध्ययनकार्य फारसे झालेले नाही. अशा दुर्लक्षीत समाजाचे संशोधन करणे आवश्यक आहे. त्यांच्या सामाजीक, सांस्कृतिक, राजकीय, धार्मिक, ैक्षणिक, कौटुंबीक स्थितीचे अध्ययन करण्याची गरज आहे.

भारतात विविध जाती व जमातीचा विचार करता भटक्या—विमुक्त जमातींवर संशोधन व अभ्यास झालेला आढळत नाही. असे म्हणता येईल. कारण नाथजोगी जमातीवर संशोधन करीत असताना साहित्याच्या नुनरावलाकनाच्या वेळी संबंधीत वि यावर स्वतंत्रपणे झालेल्या लिखाणाचा अभाव आढळून येतो.संशोधनाच्या संदर्भातील ही मर्यादा लक्षात घेता भारतामध्ये

अस्तित्वात असलेल्या जाती व जमातींच्या शासकीय वर्गीकरणच्या प्रवर्गाचा आधार घेउन नाथजोगी समाज कोणत्या प्रवर्गात वर्गीकृत होतो त्या भटक्या–विमुक्त या प्रवर्गाच्या आधारे उपलब्ध असलेल्या साहित्याचे या ठिकाणी पुनरावलोकन करून संबंधित संशोधनाला योग्य दिशा देण्याचा प्रयत्न केला आहे.

भारतातील भटक्या विमुक्त जाती व जमाती

भटके (Nomadic)या शब्दाची नेमो (Nemo) या ग्रीक शब्दात शोधता येते. त्याचा अर्थ चारणे. विविध जनावरांना घेउन जेथे चारा उपजब्ध होईल तेथे नेण्याच्या प्रवृत्तीतून एक समाज निर्माण झाला. या निमित्ताने हिंडणरा व पुढे आपल्याही उपजीविकेसाठी भटकणारा तो भटका (Nimadic) समाज बनला. 'द रॉयल अॅथ्रॉपॉलॉजीकल इन्स्टिटयूट ऑफ ग्रेट ब्रिटन' या संस्थेने अशी व्याख्या केली की, 'कोणतेही निश्चित निवासस्थान नसलेल्या आणि शिकार अथवा अन्न गोळा करीत हिंडणे हेच ज्यांचे प्रमुख जीवन असून त्यावरच ते अवलंबून असतात अशा लोकांचा समाज

महाराष्ट्रात अनेक भटक्या आणि विमूक्त जमाती आणि जाती वास्तव्यास आहेत. महाराष्ट सरकारने जाहीर केलेल्या भटक्या व विमुक्त जाती आणि जमातीच्या यादीत भराडी ही एक स्वतंत्र जात असून ती जात काही उपजातीमध्ये विभागलेली आहे.

भराडी या जातीच्या उपजाती पुढीलप्रमाणे आहेत.

१) बालसंतो ाी, २)किंगरीवाले, ३)नाथबाबा ४) नाथजोगी ५)नाथपंथी डवरी गोसावी

नाथजोगी ही भराडी या स्वतंत्र जातीची उपजात आहे.महाराष्ट्रीय ज्ञानकोषात जोगी आणि गोसावी या दोन्हीही भिन्न जाती असल्याचे म्हटले आहे म्हणून जोगी या जातीचे पुन्हा १२ पोटभाग असल्याचे सांगितले जाते. प्रत्येक पोटभागात अंतर्विवाह रूढ असून ते दुसया पोटभागाशी बेटीव्यवहार करीत नाही.जोगी हे नाथपंथी असून लोक त्यांना कानफाटे असे म्हणतात. नाथजोग्यांमध्ये झटकर, राक्षब, सावंत, लांडापले, पराप्ते, नागनाथ, जपकत, चव्हाण, शिंदे, मांडवकर, बाबर, भटी, ही अडनावे आहेत.

नाथजोगी मुळ शैव असून भैरवाचे उपासक आहेत, तरी ते देवीचा भराड घालतात. भराड घालण्याचा कार्यक्रम गोंधळाच्या देवीच्या जागरासारखा असतो. भराड घालणारे म्हणून नाथजोग्यांना भराडी असे नाव आहे. नाथजोग्यांना कोणताही विशिष्ट व्यवसाय नाही, भिक्षा मागणे, भविष्य सांगणे, मोलमजूरी करणे, गोणे गोदडी शिवणे, बाळया बुगडया विकणे तसेच इतर कामे करून उदरनिर्वाह चालवतात. इतर भटक्या जातीप्रमाणेच नाथजोगी समाजाने आपली भाषा विकसित व प्रचलीत केली आहे.

नाथजोगी समाजातील प्रथा, परंपरा, कुटूंबव्यवस्था, धर्म, विवाह, संस्करविधी, शैक्षणिक स्थिती, राजकीय संघटन, कुळ कुळाचार, श्रध्दा, विश्वास, स्त्रीयांचा दर्जा इत्यादी घटकांची माहीती मिळवण्यासाठी प्रस्तूत विषयाची निवड करण्यात आली आहे. यामूळे नाथजोगी समाजाविषयी संपूर्ण माहीती समाज व शासनाच्या निदर्शनास आणता येईल.

**संदर्भग्रंथसूची–**

१) रामनाथ चव्हाण (१९८९) 'जाती आणि जमाती'
२) रामनाथ चव्हाण (२००३) 'भटक्यांचे अंतरंग'
३) कांबळे उत्तम (१९८८) 'भटक्यांचे लग्न'
४) रामनाथ चव्हाण (२००२) 'भटक्याविमुक्तांची जातीपंचायत'
५) शंकरराव खरात (२००३) 'भटक्याविमुक्त जमाती व त्यांचे प्रश्न'
६) त्रि.ना. अत्रे (१९९१) 'गुन्हेगारी जमाती'
७) त्रि.ना. अत्रे (१९१५) 'गावगाडा'
८) लक्ष्मण माने (१९९७) 'विमुक्तायन'
९) गर्गे स.मा. 'भारतीय समाजविज्ञानकोश खंड ३'
१०) डॉ. प्रदीप आगलावे (२०००) 'संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे'
११) डॉ. एस.जी. देवगावकर (२०१३) 'महाराष्टातील निवडक जाती,जमाती'
१२) विनायक लष्कर (२०१५) 'वडार समाज समाजशास्त्रीय अध्ययन'